क्रमांक :- ५६

# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग - दोन

**गुरुवार, दिनांक २४ जून, २०२१ / आषाढ ४, १९४३ (शके)**

**विशेषाधिकार सूचनांवरील कार्यपध्दतीबाबत**

**५६. सर्व सन्माननीय सदस्यांना महाराष्ट्र विधानसभा नियमातील नियम २७३ ते २७७ मधील तरतुदींच्या अधीनतेने विशेषाधिकारांसंदर्भातील प्रश्न उपस्थित करताना पुढील कार्यपध्दतीनुसार उपस्थित करण्यात यावेत असे निदेशानुसार कळविण्यात येत आहे.**

- महाराष्ट्र विधानसभा नियम २७३ मधील तरतुदींन्वये कोणताही विशेषाधिकाराचा प्रश्न ज्यामध्ये सदस्यांच्या, विधानसभेच्या किंवा विधानसभेच्या एखाद्या समितीच्या विशेषाधिकाराचा भंग अंतर्भूत असेल असा प्रश्न केवळ मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांच्या पूर्व संमतीनेच उपस्थित करता येईल.
- महाराष्ट्र विधानसभा नियम २७४ अन्वये ज्या दिवशी असा प्रश्न उपस्थित करावयाचा असेल त्या दिवशी सभागृहाची बैठक सुरु होण्यापूर्वी निदान एक तास अगोदर त्याबाबतची लेखी सूचना सचिवांकडे देण्यात यावी.
- महाराष्ट्र विधानसभा नियम २७५ (१) अन्वये कोणत्याही सदस्यानी एका बैठकीत एकापेक्षा अधिक विशेषाधिकाराचे प्रश्न उपस्थित करु नयेत.
- महाराष्ट्र विधानसभा नियम २७५ (२) अन्वये असा विशेषाधिकाराचा प्रश्न लगतपूर्वीच्या अधिवेशना नंतर घडलेल्या विशिष्ट बाबींपुरताच मर्यादीत असावा.
- मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी विधानसभा नियम २७३ अन्वये जर संमती दिली असेल आणि विशेषाधिकाराचा प्रश्न नियमानुसार आहे असे मा.अध्यक्ष यांचे मत असेल तरच सन्माननीय सदस्यांना लिखित स्वरुपात प्रश्न उपस्थित करावयाची अनुमती प्राप्त झाल्यावर व ती बाब मांडण्यास मा.अध्यक्ष यांनी त्यांना निर्देशित केल्यावरच आपल्या जागेवर उभे राहून विशेषाधिकाराचा प्रश्न सभागृहात उपस्थित करता येईल अन्यथा नाही.

..२/-

विशेषाधिकारांचे प्रश्न उपस्थित करताना उपरोल्लिखित मार्गदर्शक सूचनांचे सन्माननीय सदस्यांनी काटेकोरपणे पालन करुनच विशेषाधिकाराचा प्रश्न सभागृहात उपस्थित करावा जेणेकरुन मा.अध्यक्ष यांना विशेषाधिकाराचा प्रश्न गुणवत्तेवर तपासून त्यावर यथोचित निर्णय घेणे सुलभ होईल.

**विधान भवन,**
**मुंबई.**
**दिनांक : २४ जून, २०२१**

**राजेन्द्र भागवत**
**सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :-**

१) मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी

२) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी

३) महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य

४) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष

५) विधानभवन इमारतीमधील सर्व पक्ष कार्यालये.

६) संगणक कक्ष (वेबसाईट)